4 MAR 2017
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



**कोल्हापूर : अजित राजेंद्र पवार याने विज्ञान संशोधन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल त्याचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.**

# अजित पवारचे विज्ञान संशोधन स्पर्धेत यश

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागातील बी.एस्सी. भाग-३ मधील विद्यार्थी अजित राजेंद्र पवार याने विज्ञान संशोधन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. मराठी विज्ञान परिषदेतर्फे स्पर्धा झाली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी अजितचा नुकताच सत्कार केला. स्पर्धेत ७५ प्रकल्पांपैकी आठ प्रकल्प अंतिम सादरीकरणासाठी निवडण्यात आले होते. त्यातून अजितच्या प्रकल्पाने प्रथम क्रमांक मिळवला. त्याने साखर कारखान्यांतील मळीवरील प्रक्रियेसंदर्भात प्रकल्प सादर केला. त्याला डॉ. सी. एच. भोसले यांचे मार्गदर्शन मिळाले. या वेळी डॉ. भोसले, अधिविभाग प्रमुख डॉ. पी. एस. पाटील, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

4 MAR 2017 महाराष्ट्र टाईम्स जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात चित्रपट महोत्सव

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त सात ते नऊ मार्च या कालावधीत शिवाजी विद्यापीठात चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठ विदेशी भाषा विभाग व दक्षिणायन महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या या महोत्सवात चार चित्रपट दाखविले जाणार आहेत.

८ मार्चला संपूर्ण जगभरात स्त्रियांची सद्य:स्थिती व त्यांचे प्रश्न याबाबत विचारमंथन होते. पितृसत्ताक मूल्ये व भांडवलदारी व्यवस्था यांच्या प्रभावाखाली समाजातील स्त्री-पुरुष विषमतेचा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा होत चालला आहे. स्त्रियांचा समान दर्जा व मानवी हक्क यासाठीचा संघर्ष बिकट होत आहे. या गंभीर परिस्थितीतही असंख्य स्त्रिया विविध स्तरांवर समतेच्या तत्त्वासाठी व न्यायासाठी लढे देत आहेत. स्त्रियांच्या याच संघर्षशील जीवनाची एक विवेकी, सशक्त, सकारात्मक बाजू महिला दिनाच्या निमित्ताने समाजासमोर येणे आवश्यक ठरते. याच विचारातून अभिनव चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

**महिला दिनानिमित्त ७ मार्च पासून चार चित्रपट**

पद्मश्री डॉ. गणेश देवी या दक्षिणायन मंचाच्या संस्थापिका असून, या संस्थेच्या माध्यमातून चित्रपट महोत्सव होणार आहे. दिग्दर्शक अमोल पालेकर व संध्या गोखले यांनी स्त्रियांचे विविध प्रकारचे संघर्ष मांडणाऱ्या चित्रपटांची निवड केली असून ते चित्रपट दाखविण्यात येणार असल्याचे पत्रक शिवाजी विद्यापीठाने प्रसिद्ध केले आहे.



4 MAR 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# विद्यापीठात महिलादिनी चित्रपट महोत्सव

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ८ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय महिलादिन साजरा केला जाणार आहे. स्त्रियांच्या संघर्षशील जीवनाची एक विवेकी, सशक्त, सकारात्मक बाजू महिलादिनाच्या निमित्ताने समाजासमोर येणे आवश्यक ठरते. याच विचारातून एक अभिनव चित्रपट महोत्सव शिवाजी विद्यापीठात आयोजित करण्यात येत आहे. या महोत्सवांतर्गत ७ ते ९ मार्च या काळात चार चित्रपट प्रदर्शित केले जात आहेत.

'दक्षिणायन' हा लोकशाही, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, सामाजिक न्याय व मानवी हक्क यासाठी लढणाऱ्या देशातील पुरोगामी, समविचारी व्यक्ती, संघटना यांचा मंच आहे. पद्मश्री डॉ. गणेश देवी हे या मंचाचे संस्थापक, समन्वयक आहेत.

**७ ते ९ मार्च दरम्यान चार चित्रपट प्रदर्शित होणार**

'दक्षिणायन'च्या चित्रपट महोत्सवासाठी विख्यात अभिनेते, दिग्दर्शक अमोल पालेकर आणि संध्या गोखले यांनी स्त्रियांचे विविध प्रकारचे संघर्ष मांडणाऱ्या आठ चित्रपटांची निवड केली व ते उपलब्ध करून दिले. स्त्री पात्र केंद्रस्थानी असणारे देशी व विदेशी भाषेतील हे चित्रपट जगविख्यात दिग्दर्शकांनी दिग्दर्शित केले आहेत. हे चित्रपट मार्च महिन्यात तीन राज्यांत, मुंबई व पुण्यासह २४ गावांत प्रदर्शित करण्यात येत आहेत. चित्रपटानंतर चर्चाही होईल, अशी माहिती डॉ. मेघा पानसरे यांनी दिली आहे. दरम्यान, ७ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजता वि.स.खांडेकर भाषा भवन येथे 'मिर्च मसाला' हा चित्रपट दाखवण्यात येणार असून प्रवेश सर्वांना खुला आहे.

4 MAR 2017 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# योग्य नियोजनातूनच यश मिळवणे शक्य : नाईकडे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

आयुष्यात कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी योग्य नियोजन करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन उपवनसंरक्षक रंगनाथ नाईकडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सेवापूर्व मार्गदर्शन केंद्रातर्फे विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्राचे समन्वयक डॉ. जगन कराडे होते.

नाईकडे म्हणाले, स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्याचे लक्ष्य विद्यार्थ्यांनी बाळगावेच, पण त्याचबरोबर आपल्या करिअरचा प्लॅन 'बी'सुद्धा तयार ठेवावा, जेणेकरून स्पर्धा परीक्षेपेक्षाही आयुष्यात यशस्वी होणे शक्य होईल. आयुष्यात कोणत्याही क्षेत्रात जा, नेहमी वरच्या मजल्यावर जाण्याचे नियोजन करा. आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन गांभीर्याचा असायला हवा. अभ्यास करताना मागील दहा वर्षांतील प्रश्नपत्रिका अभ्यासाव्यात. चालू घडामोडींचा अभ्यास मात्र अद्ययावत करणे गरजेचे आहे, असेही त्यांनी सांगितले.



कोल्हापूर : व्याख्यानात बोलताना उपवनसंरक्षक रंगनाथ नाईकडे.

कॅप्टन डॉ. लक्ष्मीकांत कलंत्री यांनी विद्यार्थ्यांना 'स्वतःला ओळखण्याचा' सल्ला दिला. जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या बळावरच विद्यार्थ्यांना हव्या त्या क्षेत्रात यश मिळवणे शक्य आहे. यशासाठी कोणताही शॉर्टकट नसतो, असे त्यांनी सांगितले.

यावेळी रेशीम संचालनालयाचे माजी संचालक कॅप्टन डॉ. लक्ष्मीकांत कलंत्री यांनीही मार्गदर्शन केले. डॉ. जगन कराडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तसेच आभार मानले.

तरुण भारत
4 MAR 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

थोडक्यात महत्त्वाचे

# डॉ. विलास संगवे अ‍ॅकॅडमीतर्फे उद्या नेतृत्व कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासन व दक्षिण भारत जैन सभेच्या डॉ. विलास संगवे अ‍ॅकॅडमीच्या वतीने रविवार ५ रोजी एक दिवसीय नेतृत्व कार्यशाळेचे आयोजन भाषा भवनमध्ये करण्यात आले आहे, असे पत्रक दिगंबर जैन बोर्डिंगचे चेअरमन सुरेश शेटे यांनी प्रसिद्धीस दिले आहे. या नेतृत्व कार्यशाळेचे उद्घाटन सकाळी १० वाजता कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते व दक्षिण भारत जैन सभेचे अध्यक्ष रावसाहेब पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. प्रमुख वक्ते व्यवस्थापन तज्ज्ञ प्रशांत पितालिया यांचे 'नेतृत्व, विकास व प्रेरणा' या विषयावर व्याख्यान होणार आहे. दुपारच्या सत्रात इस्लामपूर आर. आय.टी.च्या ,सहायक प्राध्यापक डॉ. सौ. अनुराधा गायकवाड (महिला व नेतृत्व गुणांचा विकास), सायबरचे सहायक प्राध्यापक डॉ. राजेंद्र पारिजात (व्यक्तिमत्व विकास, समाज आणि निर्णय क्षमता), प्रा. सुनीलकुमार लवटे (बदलती परिस्थिती आणि कार्यकर्त्यांची जडणघडण) यांची व्याख्याने होणार आहेत. कार्यशाळेचा समारोप शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा विभाग प्रमुख डॉ. बी. एम. हिर्डेकर यांच्या उपस्थितीत व ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

- 4 MAR 2017 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जागतिकीकरणाच्या काळात सर्वसमावेशक विकासाची गरज

## डॉ. बी.पी. वीरभद्राप्पा यांचे प्रतिपादन; विद्यापीठातील राष्ट्रीय चर्चासत्राचा समारोप

प्रतिनिधी
कोल्हापूर

जागतिकीकरणामुळे समावेशक विकासाची व्याप्ती व स्वरूप वाढले असून ते साध्य करण्यासाठी अधिक व्यापक आणि सखोल प्रयत्नांची गरज असल्याचे प्रतिपादन डॉ. बी. पी. वीरभद्राप्पा यांनी केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी चर्चासत्राचे संचालक व अर्थशास्त्र अधिविभाग प्रमुख प्रा.डॉ. पी. एस. कांबळे होते.

शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र अधिविभागामार्फत 'सर्वसमावेशक विकास: भारत कोठे आहे' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्राच्या सांगता समारोपाला प्रमुख पाहुणे म्हणून दावणगेरी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. बी. पी. वीरभद्राप्पा उपस्थित होते. यावेळी त्यांनी जागतिकीकरणाच्या कालावाधीमधील समावेशक विकासाचे स्वरूप आणि व्याप्ती काय असू शकेल, याबाबत सविस्तर मांडणी केली.

**विकासाच्या अग्रक्रमाने विचारांची अंमलबजावणी करणे आवश्यक**

ते म्हणाले, नवीन आर्थिक धोरणाचा भाग म्हणून जागतिकीकरणामुळे देशाच्या आर्थिक विकासास मदत होत आहे. मात्र या साध्य होत असलेल्या आर्थिक वृद्धीच्या लाभाचे वाटप समान व न्यायपद्धतीने करायला हवा. त्यासाठी समावेशक विकासाचा अग्रक्रमाने विचार करून अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

चर्चासत्राचे संचालक व अर्थशास्त्र अधिविभाग प्रमुख प्रा.डॉ.पी. एस. कांबळे यांनी समावेशक विकासाचे सैद्धांतिक विवेचन व संकल्पनात्मक बाजू मांडून भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात राष्ट्रीय पातळीवर व राज्यनिहाय त्याचे स्वरूप व व्याप्ती काय आहे, याचे विवेचन केले. ते म्हणाले, १९९१ च्या आर्थिक सुधारणानंतर आपण आर्थिक वृद्धीला सर्वाधिक महत्व देऊन त्यांच्या लाभांचे वाटप सर्वांपर्यंत पोहचवण्यासाठी न केलेल्या प्रयत्नामुळे सर्वसमावेशक वृद्धीचे उद्दिष्ट ११ व्या पंचवार्षिक योजनेत निश्चित केले. ते अपेक्षित उद्दिष्ट साध्य न झाल्याने ते १२व्या योजनेत कायम केले. विद्यमान स्थितीचा विचार केल्यास ते १३व्या योजनेत अंतर्भूत करण्याची गरज असल्याचे त्यांनी विषद केले.

या राष्ट्रीय चर्चासत्रात एकूण ६० संशोधकांनी आपले शोध निबंध सादर केले. प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. विद्या कट्टी यांनी तर आभार सहायक प्रा. सुभास कोंबडे यांनी मानले. यावेळी चर्चासत्राच्या समन्वयक डॉ. विद्या कट्टी, प्रा. डॉ. एस. इंद्रकांत, प्रा. डॉ. आर. जी. दांडगे, प्रा. डॉ. एम. एस. देशमुख, एस. टी. कोंबडे, एस. पी. पंचगल्ले यांच्यासह प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्राचे अभ्यासक व विद्यार्थी उपस्थित होते.

4 MAR 2017 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विज्ञान संशोधन स्पर्धेत अजित पवार प्रथम

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागातील बी.एस्सी. भाग तीनमधील .विद्यार्थी अजित राजेंद्र पवार याने मराठी विज्ञान परिषदेने आयोजित केलेल्या विज्ञान संशोधन स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी अजित पवार याचे अभिनंदन केले. या स्पर्धेत ७५ प्रकल्पांपैकी आठ प्रकल्प अंतिम सादरीकरणासाठी निवडण्यात आले होते. त्यातून अजित पवार याच्या प्रकल्पाने प्रथम क्रमांक मिळवला. त्याने साखर कारखान्यांतील मळीवरील प्रक्रियेसंदर्भात प्रकल्प सादर केला. अजित पवारला डॉ. सी. एच. भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. कुलगुरू डॉ. शिंदे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्याचे अभिनंदन केले. यावेळी डॉ. भोसले यांच्यासह अधिविभाग प्रमुख डॉ. पी. एस. पाटील, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

4 MAR 2017 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नांदेड संघाची विजयी सलामी

## शिवाजी विद्यापीठ टी-२० क्रिकेट स्पर्धा

**कोल्हापूर : क्रीडा प्रतिनिधी**

एस.आर.टी.एम.यू. नांदेड संघाने नॉर्थ महाराष्ट्र युनिव्हर्सिटी, जळगाव संघावर चार विकेटस्‌नी मात करून शिवाजी विद्यापीठ कर्मचारी टी-२० क्रिकेट स्पर्धेत विजयी सलामी दिली. नाणेफेक जिंकून जळगाव संघाने २० षटकांत सर्वबाद १५६ धावा केल्या. यामध्ये स्नेहल कुमारने ४१ धावा केल्या. उत्तरादाखल खेळताना एस.आर.टी.एम.यू. संघाने ४ विकेटस् गमावून १५७ धावा केल्या. यामध्ये गणेश पोवारने ४४, तर शकील रशीदने ३४ धावा केल्या.

खा. संभाजीराजे यांच्या हस्ते बुधवारी ध्वजवंदनाने क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. उद्घाटनानंतर खा. संभाजीराजे यांनी मैदानात उतरून आपल्या बॅटिंगची चुणूकही दाखविली. शिवाजी विद्यापीठाच्या मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुलाच्या मैदानावर स्पर्धेला प्रारंभ झाला.

खा. संभाजीराजे म्हणाले, कर्मचाऱ्यांच्या क्रीडा गुणांना चालना देण्याच्या दृष्टीने अशा स्पर्धांचे आयोजन विद्यापीठ पातळीवर होणे ही अत्यंत उल्लेखनीय बाब आहे. अशा स्पर्धा नियमितपणे आयोजित व्हाव्यात, यादृष्टीने सरकारच्या स्तरावर काही धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा असेल, तर त्यासाठी आपण विद्यापीठास सर्वतोपरी सहकार्य करू, अशी ग्वाही याप्रसंगी त्यांनी दिली. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत केले.

यावेळी बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, पी. ए. तथा बाबा सावंत, महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष रमेश शिंदे यांच्यासह अधिकारी, प्रशासकीय सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ कर्मचारी टी-२० क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन खा. संभाजीराजे यांच्या हस्ते हवेत फुगे सोडून झाले. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. आर. मोरे, अजित चौगुले, बाबा सावंत, रमेश शिंदे यांच्यासह अधिकारी, खेळाडू आदी उपस्थित होते.**

### क्रिकेट माझं पॅशन : खा. संभाजीराजे

क्रिकेट हे माझं पॅशन आहे. शिवाजी विद्यापीठाच्या याच मैदानावर मी क्रिकेट खेळलो. कित्येक सामन्यांचा आनंद घेतला. सागर पवारसारखा क्रिकेटपटू मित्र याच मैदानावर लाभला, अशा आठवणी खासदार संभाजीराजे यांनी जागविल्या. निमित्त होतं, शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित अखिल महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेचे.

4 MAR 2017 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गणित विषयावरील राष्ट्रीय परिसंवादाला प्रतिसाद

## विद्यापीठात पाच राज्यांतील ८० संशोधकांचा सहभाग : ३५ संशोधक पत्रिका सादर

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात गणित अधिविभागातर्फे २७ व २८ फेब्रुवारी रोजी एसइआरबी , सीएसआयआर व युजीसी पुरस्कृत 'नॅशनल सेमिनार ऑन डिफ्रन्शीअल इक्वेशन अॅन्ड डायनॅमिकल सिस्टिम्स २०१७' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादासाठी महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, केरळ, गुजरात या राज्यातून ८० संशोधकांनी सहभाग नोंदवला. तसेच एकूण ३५ संशोधक पत्रिका सादर करण्यात आल्या.

गणित अधिविभागाच्या रामानुजन सभागृहात या राष्ट्रीय परिसंवादाचे उद्घाटन झाले. यावेळी आतंरराष्ट्रीय कीर्तीचे गणितज्ज्ञ प्रा. ए. एम. मथाई, बी. सी. यु. डी. संचालक डॉ. डी. आर. मोरे, गणित अधिविभाग प्रमुख प्रा. एल. एन. कातकर, प्राध्यापिका डॉ. एस. एच. ठकार, संयोजक डॉ. के. डी. कुच्चे व डॉ. एस. बी. भालेकर उपस्थित होते .

या परिसंवादाचा मुख्य उद्देश संबंधित विषयातील संशोधनात्मक प्रगतीचा आढावा व विज्ञान आणि तंत्रज्ञान या क्षेत्रातील उपयुक्तता असा होता. या परिसंवादात विविध आमंत्रित तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून संशोधनातील चालू घडामोडी आणि इतर क्षेत्रातील त्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

परिसंवादाचे प्रमुख वक्ते प्रा. ए. एम .मथाई यांनी संशोधक विद्यार्थ्यांना या विषयाची उपयुक्तता व त्याची विपुलता याचे महत्व पटवून दिले. डॉ. डी. आर. मोरे यांनी गणित विषयातील अशा राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन दरवर्षी करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. गणित अधिविभाग प्रमुख डॉ. एल. एन. कातकर यांनी अॅरिस्टोटल यांच्या काळापासून ते आजच्या गणिताच्या विषयात कसा बदल होत गेला, याबद्दल विस्तृत विवेचन केले.

संयोजक डॉ. के. डी कुच्चे यांनी या परिसंवादासंबधी माहिती दिली. डॉ. भालेकर व डॉ. गोफणे यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रा. कुंभार यांनी आभार मानले. या परिसंवादाचे आयोजन करण्यासाठी गणित अधिविभागातील प्रा. स्नेहल मित्रगोत्री , प्रा. ज्योती थोरवे , प्रा. जयकुमार भोसले व प्रा. श्रद्धा खराडे यांचे सहकार्य लाभले.

- 4 MAR 2017 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारतीय खेळाडूंमध्ये उच्च गुणवत्ता

## ज्वेल विलियम्स : कॉमर्स कॉलेजमध्ये राष्ट्रीय परिषद

कोल्हापूर : खेळ कोणताही असो; त्यात भारतीय खेळाडूंमध्ये राष्ट्रीय स्तरावर चमकण्याकरिता उच्च क्षमतेची गुणवत्ता आहे, असे मत युरोपमधील अर्सेनल फुटबॉल संघाचे प्रशिक्षक ज्वेल रिचर्ड विलियम्स यांनी व्यक्त केले. देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स मध्ये शिवाजी विद्यापीठ व महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल संघटनेतर्फे 'रिसेंट ॲडव्हान्स इन फिजिकल एज्युकेशन अँड स्पोर्टस सायन्सेस' या विषयावर शुक्रवारी आयोजित राष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी 'विद्यापीठ विकास मंडळा'चे संचालक डॉ. डी. आर. मोरे होते.

विलियम्स म्हणाले, खेळाडूंनी केवळ क्रिकेटकडे लक्ष केंद्रित न करता इतर खेळांकडेही लक्ष दिले पाहिजे. प्रशिक्षकांनीही खेळाडूंमधील गुणवत्ता हेरुन त्याला प्रशिक्षित करण्यासाठी नावीन्याचा ध्यास घेतला पाहिजे. भारतीय खेळाडूंमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकण्याची गुणवत्ता आहे. यासाठी खेळाडूंवर कठोर परिश्रम घेतले पाहिजेत, असे मत त्यांनी मांडले. या परिषदेत संपूर्ण देशातून १२५ हून अधिक शोधप्रबंध सादर झाले. यात प्रसिद्ध फिजिओथेरपिस्ट डॉ. रोहन चव्हाण व डॉ. किरण रुकडीकर यांनी यासंबंधी विविध समस्यांवर मार्गदर्शन केले.



कोल्हापुरातील देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये 'रिसेंट ॲडव्हान्स इन फिजिकल एज्युकेशन अँड स्पोर्टस सायन्सेस' विषयावर शुक्रवारी आयोजित राष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन ज्वेल रिचर्ड विलियम्स यांनी केले. यावेळी रजनीताई मगदूम, प्रसाद कामत, डॉ. डी. आर. मोरे, आदी उपस्थित होते.

यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, कोल्हापूर कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम, प्रसाद कामत, ॲड. व्ही. एन. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, शरद बनसोडे,आदी उपस्थित होते.